जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
पुढारी




शिवाजी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीत छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)

## विद्यापीठ प्रशासकीय इमारतीत अभिवादन

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तुकाराम चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, अजित चौगुले, रणजित यादव यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बुधवारी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बुधवारी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तुकाराम चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, अजित चौगुले, रणजीत यादव यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
15 MAY 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठामध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरु डॉ.प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. धनंजय सुतार, डॉ.तुकाराम चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ.शरद बनसोडे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ.अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ.उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, अजित चौगुले, रणजीत यादव यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, धनंजय सुतार, तुकाराम चौगुले, रामचंद्र पवार, शरद बनसोडे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, दत्तात्रय मचाले, उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, अजित चौगुले, रणजित यादव उपस्थित होते

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
सकाळ



# शहरात विद्यापीठातर्फे 'राष्ट्रभक्ती जागृती' प्रभात फेरी

**कोल्हापूर :** भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशभर 'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह' साजरा करण्याबाबत कुलपती कार्यालयाने निर्देशित केले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठातर्फे देशभक्ती सप्ताह २० मेपर्यंत आयोजित केला आहे. त्याअंतर्गत मंगळवारी सकाळी शहरातून प्रभातफेरी काढली. शहरातील दसरा चौक, बिंदू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयामार्गे दसरा चौक या मार्गावरून प्रभात फेरी काढण्यात आली. त्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार, तानाजी चौगुले, शरद बनसोडे यांच्यासह दीडशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. दरम्यान, या सप्ताहाअंतर्गत शनिवारी (ता. १७) सकाळी नऊ ते दुपारी एक या कालावधीत विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठामध्ये राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह

**कोल्हापूर :** भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशभर 'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह' साजरा करण्याबाबत कुलपती कार्यालयाने निर्देशित केले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठामार्फतही 'देशभक्ती सप्ताह' दि. १३ ते २० मे या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. याची सुरुवात म्हणून बुधवारी दसरा चौक ते बिंदू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि पुन्हा छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयामार्गे दसरा चौक अशी प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे यांच्यासह दीडशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. उपक्रमाचा भाग म्हणून दि. १७ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या कालावधीत विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तसेच सजग नागरिकांनी या शिबिरामध्ये रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठात 'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह'
#shivajiuniversity #kolhapurcity #In... See more

संपादक : दीपक मांगले

टाइम्स २४

बातम्या | मुलाखती | मनोरंजन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Wednesday
14 May 2025

# शिवाजी विद्यापीठात 'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह'

## रक्तदान शिबिरासह विविध उपक्रम

**कोल्हापूर :** भारत - पाकिस्तान युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशभर **'राष्ट्रभक्ती जागृती सप्ताह'** साजरा करण्याचे निर्देश कुलपती कार्यालयाने दिले आहेत. त्यानुसार, शिवाजी विद्यापीठात 13 ते 20 मे या कालावधीत **'देशभक्ती सप्ताह'** आयोजित करण्यात आला आहे.

या सप्ताहाची सुरुवात प्रभात फेरीने झाली. दसरा चौक ते बिंदू चौक, छत्रपती शिवाजी चौक आणि छत्रपती प्रमिला राजे रूग्णालय मार्गे पुन्हा दसरा चौक असा या फेरीचा मार्ग होता. या फेरीत कुलगुरू डॉ.



दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे यांच्यासह 150 हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAY 2025
तरुण भारत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या आठ विषयांच्या प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडली. या परीक्षेला १ हजार १२४ विद्यार्थ्यांपैकी ९५७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १६७ विद्यार्थी अनुपस्थित होते. एमसीए सायन्स, एमए मास कम्युनिकेशन, एमएस्सी, नॅनो सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी, एमएस्सी कॉम्प्युटर सायन्स, एमएस्सी अॅग्रो केमिकल अॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एमएस्सी फुड सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी विषयांचा समावेश होता. शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाला २०२५-२६ मध्ये प्रवेश घेण्यासाठीची प्रवेश परीक्षा १७ मेपर्यंत कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव जिल्ह्यांमध्ये होणार आहे. ही परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी समन्वयकांची नियुक्ती केली आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरळीत पार पडल्या. बुधवारी बीए., बीएस्सी., बीसीए., बीआयडी, बीबीए., एमबीए., बॅचलर ऑफ लॉ, एमए, डिप्लोमा इन रशियन लँग्वेज, सर्टीफिकेज कोर्स इन पोर्तुगीज, सर्टीफिकेट इन रशियन लँग्वेज, डिप्लोमा कोर्स इन पोर्तुगीज अशा ६३ अभ्यासक्रमाच्या परीक्षा १५२ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. ४७ हजार ६७३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. तसेच आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ९८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.